# राजकारण आणि घमेंड

अरुण जेटली

विरोधी पक्षनेते (राज्यसभा)

लोकशाही अत्यंत महत्त्वाची व्यवस्था आहे. त्या मतांच्या शक्तीने राजकारण्यांना सत्तेवर पोचवते, तर कधी त्यांना सत्तेवरुन फेकून पण देते. इतिहास या गोष्टींचा साक्षी आहे की जेव्हा नेत्याला सत्तेवरुन फेकून दिले जाते तेव्हा त्याला पाठिंबा देणा-याची संख्या पण त्यांना सोडून देते. कॉग्रेस पक्षाच्या उपप्रमुखांच्या एका पत्रकार परिषदेत अनेक मंत्री आणि अन्य नेते उपस्थित होते. त्या पत्रकार परिषदेत लोकपाल बिल पारित झाल्यास त्याचा कशाप्रकारे फायदा होईल त्याच्या प्रभावाची माहिती निवड समितीच्या अहवालात देण्यात आली होती. त्या पत्रकार परिषदेला संबोधित करणारे चार सदगृहस्थांचे हावभाव बदलले असल्याचे दिसून आले. मागील तीन वर्षात या नेत्यांचे विविध पत्रकार परिषदेत बघायला मिळालेले हावभाव पाहता ही परिस्थिती एकदम विसंगत आहे. याआधी त्यांनी सुद्धा लोकपाल बिलाच्या मागणी करिता उपोषणावर बसलेल्या श्री अण्णा हजारे यांच्या सोबतच्या वाटाघाटी रोखल्या होत्या. त्यांनी त्या वेळी श्री हजारे यांच्या सर्व मागण्यांचा अस्वीकार केला होता. त्यांनी आता त्यांचा खेळ बदलला आणि लोकसभेत एक अस्वीकार्य बिल पारित केले. ते एकपक्षीय रीत्या संयुक्त विरोधादरम्यान लोकसभेत सादर झाले होते. राज्यसभेने त्या बिलात सुधार करण्याची मागणी केली होती. त्यावेळी सदनाची बैठक मध्यरात्री स्थगित करण्यात आली होती. त्यानंतर निवड समितीने पण अशीच शिफारस केली होती. जवळपास एका वर्षानंतर ते बिल पुन्हा संसदेसमोर ठेवण्यात आले. त्यांनी असा आग्रह केला होता की सीबीआय लोकपालासाठी नाही तर सरकारखाली ठेवण्यात यायला पाहिजे.

परंतु पत्रकार-परिषदेत नेत्यांची भाषा, विचारधारा आणि हावभाव खुप वेगळेच होते. त्यांनी आता एक समाधानाकारी विचारधारा देत असल्याचे पाहायला मिळाले. लोकशाही कामगीरीत मूलभूत फेरफार एका संस्थेच्या हाती अधिक काळ राहत नाही. राजकीय शक्तींचा प्रसार होत असतो. सरकार, विरोधी पक्ष, न्यायव्यवस्था, मिडीया, अंमलदारशाही, समाज, लोकांचा अभिप्राय सर्व सत्तेचे पात्र असतात. नेते स्वताला सर्वसत्ताधीश आहेत असे समजतात. ते कोणत्याही एका संस्थेशी बांधील असतात. घमेंड कधीच शक्ती बनत नसते. त्यांच्यात विश्वासाची कमी असते. घमेंड लोक शिकत नसतात. घमेंडीला कधीच आत्मविश्वास प्रमाणे पाहायला नाही पाहिजे. पत्रकार परिषदेत असेच काहीसे पाहायला मिळाले.
नवीन उभारत असलेला राजकीय पक्ष आप साठी हा एक बोध आहे. त्या पक्षाने दिल्ली विधानसभा निवडणुकीत दखल घेण्यासारखे काम केले. मात्र त्यांच्या विजयात घमेंड दिसून येते. भाजपला तीन ठिकाणी संपूर्ण बहुमत मिळाले. त्यापैकी दोन ठिकाणी प्रचंड बहुमताने भाजपा आली. तो आनंद आणि विजयोत्सव साजरा करण्याचा दिवस होता. विजयानंतर प्रतिष्ठा, सभ्यता आणि विनम्रता असण्याची गरज असते. घमेंड हे पतन होण्याची पहिली पायरी असू शकते. राजकारण जेवढे वर जाईल तेवढे ते खाली पण येत असते. तेव्हा राजकारणात विनम्रता असणे गरजेचे आहे. आप पक्षाने यातून बोध घ्यावा. आज ते राजकीय विरोधकांना आव्हान देत आहेत. ते अन्य पक्षांच्या नेत्यांसाठी विनयशील नाहीत. श्रीमती सोनिया गांधी आणि श्री राजनाथ सिंह यांच्यासाठी त्यांच्या शब्दात उद्धटपणा दिसून येतो. त्यांनी आपले मार्गदर्शक अण्णा हजारे यांना पण सोडले नाही.
राजकीय वर्गासाठी ते एक बोध घेण्यासारखेच आहेत. लोकपाला विषयी घमेंडी वर्तन ठेवणारे कॉंग्रेसने तीन वर्षानंतर पण समाधानकारी निर्णय घेतला. मात्र आप पक्षाने यातून काहीतरी शिकावे अशी आशा आहे.